दिनांक : २०/०४/२०२६

## सभेची सूचना

सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग संस्थांनी फेडरेशन करिता निवडून दिलेल्या सर्व प्रतिनिधींना कळविण्यात येते की, मंगळवार दिनांक ०५/०५/२०२६ रोजी रात्री ठीक ०८.०० वाजता सर्व प्रतिनिधींची सभा सत्यम सोसायटीचे कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली आहे. तरी खालील विषयांचे महत्व ओळखून सर्व प्रतिनिधींनी सभेला वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१ संकल्पित सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन यांच्या मुख्य प्रवर्तकांची निवड करणे.

२ संकल्पित हौसिंग फेडरेशन करिता नावाचे आरक्षण करून घेण्यासाठी अर्ज करण्याबाबत मुख्य प्रवर्तकास प्राधिकृत करणे.

३ नोंदणीचा प्रस्ताव तयार करणे, तो नोंदणी प्राधिकाऱ्याकडे सादर करणे, त्याने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करून आवश्यक शर्तीची पूर्तता करणे व नोंदणी होई पर्यंत त्याचा पाठपुरावा करणे या कामासाठी एखाद्या व्यक्तीची सेवा उपलब्ध करून घेण्यास व त्या व्यक्तीचा मेहनताना ठरविण्यास मुख्य प्रवर्तकाला प्राधिकृत करणे.

४ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. या बँकेमध्ये बचत बँक खाते उघडणे व प्रवेश फी आणि भाग भांडवल या रकमा त्या खात्यात जमा करून घेणे याबाबत विचारविनिमय करणे.

आपला विश्वासू,

राजू सुखदेव कांबळे

श्री. राजू सुखदेव कांबळे

**मुख्य प्रवर्तक**

सुंदरम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग लि.

सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग संस्थांनी फेडरेशन करीता निवडून दिलेल्या सर्व प्रतिनिधींची सभा, मंगळवार दिनांक ०५/०५/२०२६ रोजी रात्री ठीक ०८.०० वाजता सत्यम सोसायटीचे कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली.

खालील उपस्थितांच्या स्वाक्षऱ्या

| अनु क्र. | संस्था | प्रतिनिधीचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | सुदरम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि. | श्री. राजू सुखदेव कांबळे | |
| २. | | श्री. अहमद मोबीन शेख | |
| ३. | | श्रीमती आशा वामन काटे | |
| ४. | | श्री. युसुफ सलीम कुमटे | |
| ५. | सत्यम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि. | श्री. जयराम काशीराम बाईत | |
| ६. | | श्री. कनगसभापती पट्टमुथू | |
| ७. | | श्री. अमर चंद्रकांत पेडणेकर | |
| ८. | | श्री. एस. आरसालय पेरूमल | |
| ९. | शांतीशिवम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि. | श्री. अनिल बंडु गजभिव | |
| १०. | | श्री. संजय अमृत घाडगे | |
| ११. | | श्री. किशोर गणपत गजमल | |
| १२. | | श्री. अशांत अनिल गजभिव | |
| १३. | सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि. | श्री. शमशुद्दीन अन्सारी | |
| १४. | | श्री. वसंत दामू गरुड | |
| १५. | | श्री. संतोष तुकाराम गोठणकर | |
| १६. | | श्रीमती अस्मा सलीम अन्सारी | |

<u>**सभेचे इतिवृत्त**</u>

श्री. राजू सुखदेव कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रतिनिधींना सांगितले की, आपल्याला ४ सोसायटयांचे फेडरेशन नोंदणी करावयाचे आहे तसे केल्याने आपल्या ४ सोसायटयांचे सार्वजनिक जागेची देखभाल किंवा आपल्या सोसायटी मध्ये येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी आपले फेडरेशन नोंदणी करणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या सभेच्या पत्रिकेवर असलेले विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे गरजेचे आहे. मी सभेला सुरुवात करतो आपण सर्वांनी मला सहकार्य करावे हीच विनंती.

विषय क्र. १. संकल्पित सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन यांच्या मुख्य प्रवर्तकांची निवड करणे.

ठराव क्र. १. श्री. राजू सुखदेव कांबळे हे संकल्पित सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन यांचे मुख्य प्रवर्तक असावेत व त्याप्रमाणे त्या पदावर ते निवड करण्यात आली.
सूचक: अहमद मोबीन शेख- सुंदरम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
अनुमोदक: अमर चंद्रकांत पेडणेकर- सत्यम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. २. संकल्पित हौसिंग फेडरेशन करिता नावाचे आरक्षण करून घेण्यासाठी अर्ज करण्याबाबत मुख्य प्रवर्तकास प्राधिकृत करणे.

ठराव क्र. २. संकल्पित हौसिंग फेडरेशनसाठी सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन (संकल्पित) या नावाचे आरक्षण करून घेण्याकरिता अर्ज करण्यास आणि त्या प्रयोजनार्थ नोंदणी प्राधिकारी मागणी करतील अशी अन्य माहिती सादर करण्यास मुख्य प्रवर्तकाला प्राधिकृत करावे व याद्वारे तसे करण्यात येत आहे. तसेच वर सुचवलेले नाव आरक्षणासाठी उपलब्ध असेल तर, पुढे दिलेल्या पर्यायी नावे क्रमानुसार मुख्य प्रवर्तकाने सुचवावीत.

१. सत्यम-शांतीशिवम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन

२. शांतीशिवम-सत्यम-सुंदरम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन

३. सुंदरम-सत्यम-शांतीशिवम-सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन

४. सचिनम-सत्यम-शांतीशिवम-सुंदरम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन

५. सुंदरम-सचिनम-सत्यम-शांतीशिवम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग फेडरेशन

सूचक: अनिल बंडु गजभिव- शांतीशिवम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
अनुमोदक: शमशुद्दीन अन्सारी- सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ३. नोंदणीचा प्रस्ताव तयार करणे, तो नोंदणी प्राधिकाऱ्याकडे सादर करणे, त्याने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करून आवश्यक शर्तीची पूर्तता करणे व नोंदणी होई पर्यंत त्याचा पाठपुरावा करणे या कामासाठी एखाद्या व्यक्तीची सेवा उपलब्ध करून घेण्यास व त्या व्यक्तीचा मेहनताना ठरविण्यास मुख्य प्रवर्तकाला प्राधिकृत करणे.

ठराव क्र. ३. नोंदणीचा प्रस्ताव तयार करणे, तो नोंदणी प्राधिकाऱ्याकडे सादर करणे, तसेच त्याने काही आक्षेप घेतल्यास त्यांचे निराकरण करून आवश्यक शर्तीची पूर्तता करणे या कामासाठी एखाद्या व्यक्तीची सेवा उपलब्ध करून घेण्यास व त्या व्यक्तीचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार मुख्य प्रवर्तकास देण्यात येत आहे. व त्यांनी त्या व्यक्तीकडून कामकाज करून घेण्यात यावे. तसेच, संकल्पित होऊसिंगण फेडरेशन ची नोंदणी करून घेण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे पुढील सर्व कार्यवाही करण्यास आवश्यक ते सर्व दस्तएवज स्वाक्षरीत करण्यास, आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यास मुख्य प्रवर्तकाला प्राधिकृत करण्यात येत आहे.

सूचक: आशा वामन काटे- सुंदरम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
अनुमोदक: कनगसभापती पट्टमुथू- सत्यम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ४. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. या बँकेमध्ये बचत बँक खाते उघडणे व प्रवेश फी आणि भाग भांडवल या रकमा त्या खात्यात जमा करून घेणे याबाबत विचारविनिमय करणे.

ठराव क्र. ४. मुख्य प्रवर्तकाने संकल्पित हौसिंग फेडरेशन च्या नावे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. या बँकेमध्ये बचत बँक खाते उघडावे व प्रत्येक सोसायटीचे २० शेअर्स प्रमाणे १०००/- रुपये भाग भांडवल आणि प्रवेश फी १००/- रुपये प्रमाणे एकूण ४,४००/- रुपये या रकमा त्या बँक खात्यात जमा करण्यात याव्यात.

सूचक: संजय अमृत घाडगे- शांतीशिवम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
अनुमोदक: वसंत दामू गरुड- सचिनम एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
ठराव सर्वानुमते मंजूर.

मुख्य प्रवर्तक श्री. राजू सुखदेव कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले व आजची सभा संपन्न झाली असे जाहीर केले.

राजू सुखदेव कांबळे
मुख्य प्रवर्तक

श्री. राजू सुखदेव कांबळे
मुख्य प्रवर्तक